समर्थन

नोंदणी क्रमांक : पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र. एफ -१८९०३ (मुंबई), सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी
११५, धुरी कामर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशनजवळ, वसई (पू), जि. पालघर-४०१२०८
दूरध्वनी क्र.: ०२५०-२३९०१०३ टेलिफॅक्स : ०२५०-२३९०१०४ www.samarthanadvocacy.org



अध्यक्ष : प्रविण महाजन  उपाध्यक्ष : आशिष कुलकर्णी  कार्याध्यक्ष : संतोष पाटील


दिनांक ७ डिसेंबर, २०१६
**समर्थन कार्यालयातून प्रसिद्ध**

प्रति,
**मान. संपादक/ मुख्य वार्ताहर**

# राज्याचे आर्थिक नियोजन डळमळले

## मूळ अर्थसंकल्पा शिवाय पुरवणी मागण्या पोहचल्या २२ हजार कोटींवर

दि. ५ डिसेंबर २०१६ रोजी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात ९ हजार ४८९ कोटींच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. मार्च २०१६चा मूळ अर्थसंकल्प २ लाख ७० हजार कोटींचा होता त्यामध्ये योजनांतर्गत खर्चासाठी ५६ हजार ९९७ कोटी रुपये राखून ठेवल्याचे म्हटले होते. जुलै मधील पावसाळी अधिवेशन व डिसेंबर मधील सुरु असलेले हिवाळी अधिवेशन असे दोन्ही अधिवेशनातील पुरवणी मागण्याची रक्कम २२ हजार ५२१ कोटींवर गेली आहे. यावरून असे दिसून येते की सर्वसामान्य जनतेला **'मेक इन महाराष्ट्राची'** स्वप्ने दाखविणाऱ्या या सरकारला राज्याची आर्थिक घडी बसविण्यात अपयश आले आहे.

अर्थसंकल्पीय नियमानुसार मूळ मागणीच्या ३ टक्क्यांपेक्षा जास्त पुरवणी मागण्या असू नयेत असे निर्देश आहेत. शिवाय या विषयी भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक (सी.ए.जी) यांनी आपल्या अहवालात बऱ्याच वेळा ताशेरेही ओढले आहेत. असे असताना जुलै व डिसेंबर, २०१६ या दोन्ही अधिवेशनातील पुरवणी मागण्याची रक्कम मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत ८.३१ टक्क्यांवर पोहचली आहे. तसेच आकस्मिकता निधितून जुलै अधिवेशनात ७६ कोटी रुपेय तर सुरु असलेल्या डिसेंबर अधिवेशनात ५४ कोटी रुपये काढण्यात आले आहेत. ज्या योजनांसाठी मूळ अर्थसंकल्पात तरतूद करणे सहज शक्य होते अशा योजनांसाठी आकस्मिकता निधीद्वारे आगाऊ रक्कम काढून तो खर्च भागविण्यासाठी पूरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय नियमांचा भंग होत नाहीना यावर विरोधी पक्षाने लक्ष ठेवणे देखील गरजेचे आहे. आज राज्यावरील कर्जाचा बोजा ३ लाख कोटींवर पोहचला आहे. निधी अभावी अनेक योजना रखडल्या आहेत. असे असताना मूळ अर्थसंकल्पात तरतूद न करता पुरवणी मागणी द्वारे विभागांना हजारो कोटी रुपये उपलब्ध करून दिले जात आहेत.

**सर्वात जास्त पूरवणी मागण्या केलेले विभाग**

| **विभाग** | **पुरवणी मागण्याची रक्कम** |
|---|---|
| कृषि व पदुम विभाग | १हजार ७१५ कोटी ८५ लाख |
| नगर विकास | १ हजार ४७५ कोटी २ लाख |
| उद्योग उर्जा व कामगार | १ हजार ३५० कोटी १० लाख |

राज्यात वर्ष २०१५-१६ मध्ये आदिवासी भागात २३ हजार बालके कुपोषित असल्याची आकडेवारी स्वत: शासनाने जाहीर केली असून या कालावधीतच ४ हजार ९१३ बालकांचे बालमृत्यू झाले आहेत. राज्यातील जिल्हा स्तरावर महिला बाल विकास, आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, आश्रमशाळा, महसुल विभागात हजारो पदे रिक्त आहेत.त्याचा परिणाम सर्वसामान्यांना आरोग्याशी संबंधीत सेवांचा लाभ घेणे दुरापस्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. आदिवासी उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना यासारख्या महत्त्वाच्या योजनांवर होणाऱ्या खर्चावर कात्री लावली जात आहे. रोजगार हमी योजनेतील मनुष्य दिवसामध्ये कमालीची घट झाल्याची आकडेवारी समोर येत आहे. असे असताना मेट्रो रेल्वे, बुलेट ट्रेन यासारख्या न परवडणाऱ्या बाबींवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे. त्यामुळे या पुरवणी मागण्यांचा उपयोग सरकार केवळ राजकीय लाभासाठी तर करत नाही आहे ना? हे पाहणे गरजेचे आहे.


E-mail : samarthanmumbai97@gmail.com / samarthan@samarthanadvocacy.org